# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 23/10/2021 (शनिवार)

(सकाळ)

---

### घरफोडी

पो.स्टे. काटोल :– अंतर्गत 3 कि.मी. अंतरावरील मौजा ठोमा लेआउट जानकी नगर काटोल येथे दिनांक 21/10/2021 चे 17.30 वा. दिनांक 22/10/2021 चे ते 08.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– संतोष शामगुपत खोब्रागडे वय 51 वर्ष, रा. ठोमा ले आउट काटोल हे दिनांक 21/10/2021 चे 17/30 वा. नागपुर येथे नातेवाईकाकडे कार्यक्रमाकरिता गेले होते. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने घरी प्रवेश करून घरातील सोन्याचे दागिने किंमत 45,000/–रू. व नगदी 5,000/–रूपये असा एकुण कि. 50,000/–रू. चा माल दिसुन आला नाही. तसेच फिर्यादीचे घराचे मागे राहत असलेले सौ. शितल नासरे यांचे घरातील सुदधा एकुण किंमत 5,000/–रू. चा माल चोरून नेला असा एकुण 55,000/–रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम 454, 457, 380 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोहवा अरूण भेंडे मो. न. 9923193642 हे करीत आहे.

### चोरी

पो.स्टे. काटोल :– अंतर्गत 05 कि.मी. अंतरावरील मौजा सावळी शिवार येथे दिनांक 21/10/2021 चे 18.00 ते दिनांक 22/10/2021 चे 05.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– व्यंकटीराव मुरलीधर तरटे वय 55 वर्ष रा. रिधोरा यांचे सावळा शिवारातुन तुराटिच्या बांधलेल्या खुल्या झोपडीतुन एक लाल रंगाची गाय किंमती 10,000/– रूपये व एक लाल रंगाचा कारोड कि. 5000/–रू. असे एकुण 15,000/– रू. ची जनावरे अज्ञात आरेपीने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार अरूण भेंडे मो.न. 9923193642 हे करीत आहे.

### फसवणुक

पो.स्टे. देवलापार :– अंतर्गत 0.2 कि मी अंतरावरील देवलापार येथे दिनांक 18/02/2020 चे 10.00 वा. ते 09/02/2021 चे 16.00 वा. पर्यंत दरम्यान फिर्यादी हे बॅक ऑफ इंडिया देवलापार येथे मॅनेजर या पदावार कार्यरत असुन त्यांनी रिपोर्ट दिली कि, यातील आरोपी नामे– नोकेंद्र शेषराव ढोबळे, वय 35 वर्श, रा. लोधा हा बॅक ऑफ इंडिया ब्रॅच देवलपार बॅकेत व्यवसाय प्रतिनीधी या पदावर काम करत होता. त्याने नमुद घ.ता.वेळी ठिकाणी बॅक खातेदाराकडुन पैसे घेवुन त्याचे पैसे खातेधारकाचे खात्यात जमा करण्याची पावती भरून त्या पावतीवर नोकेन्द्र ढोबळे व्यवसाय समन्वयक बॅक ऑफ इंडिया शाखा देवलापार चे रबरी स्टॅम्प मारून त्या पावत्या खाते धारकांना दिल्या. परंतु त्याने खातेधारकाचे पैसे 1,93,000/–रू., खातेधारकाचे खात्यात न भरता स्वतःचे आर्थिक फायदयासाठी वापरून ग्राहकांच्या पैशांची फसवणुक केली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– राहुल सिताराम बावणे वय 35 वर्ष व्यवसाय– मॅनेजर, बॅक ऑफ इंडीया शाखा देवलापार रा. लोधा यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. देवलापार येथे आरोपीविरुध्द कलम 420, 409 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पाउपेनि श्री पुंजरवाड 8668865203 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर